एसव्हीएसएस लातूर
फिजिओथेरपी, हासेगाव, ता. [illegible]

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांकः पीसीओ २०१८/प्र.क्र.२६/१८/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक : २४ सप्टेंबर, २०१८

वाचा : १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/युजी/पी-६/१३७६/२०१७, दिनांक २०.१२.२०१७

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक संवैशिवसं/ नवीन भौतिकोपचार महाविद्यालय/श्रीवेशिसंलाकॉऑफिला/७०१७/४-अ, दि. २९.०६.२०१८

<u>प्रस्तावना</u>:

श्री. वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, हासेगाव, ता. औसा, जि. लातूर या संस्थेचा भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. त्यानुसार सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेतील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला परवानगी देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील भौतिकोपचार अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी ४० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संदर्भ क्र. २ अन्वये केलेली शिफारस विचारात घेऊन, शासन श्री. वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, हासेगाव, ता. औसा, जि. लातूर या संस्थेतील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून ४० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून याद्वारे मान्यता देत आहे:-

१) या महाविद्यालयातील भौतिकोपचार पदवी या अभ्यासक्रमाच्या ४० (चाळीस) इतक्या प्रवेश क्षमतेस मंजूरी देण्यात येत आहे.

२) सदरहू संस्थेतील प्रवेश मा.सर्वोच्च न्यायालयाने टि.एम.ए.पै.फौंडेशन विरुध्द कर्नाटक शासन याचिका क्र.३१७/१९९३ या प्रकरणात दिनांक ३१/१०/२००२ रोजी दिलेला निर्णय; तसेच इस्लामिक ॲकेडमी ऑफ एज्युकेशन विरुध्द कर्नाटक शासन प्रकरण क्र.३५०/१९९३ या प्रकरणात दिनांक १४/०८/२००३ रोजी दिलेला निर्णय आणि पी.ए.इनामदार विरुद्ध महाराष्ट्र शासन प्रकरण क्रमांक ५०४१/२००४ दिनांक १२/०८/२००५ नुसार करावेत.

३) राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती / अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरण्यात येणार नाहीत.

८) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण अथवा तत्सम प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

१०) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व संचालक, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या शिफारशींच्या आधारे परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्री.पुं.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
५) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
६) कार्यालयीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन आवार, अलीयावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे (पूर्व).
७) सचिव/प्राचार्य, श्री. वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, हासेगाव, ता. औसा, जि. लातूर.
८) अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस महाराष्ट्र, पोटमाळा श्रीजी हाऊस, ७५ मिंट रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
९) निवडनस्ती (शिक्षण-१).